मा. प्रशासक
पुणे महानगरपालिका

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक:०४/०७/२०२५

पुणे महानगरपालिका
स्थायी समिती
दाखल कार्यपत्रिका

विषय क्र.२८३त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडील प्राथमिक व माध्यमिक शालेय विद्यार्थी व विद्यार्थीनीना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तू स्वरुपात मिळणाऱ्या लाभांचे हस्तांतरण DBT (Direct Benifit Transfer) योजने अंतर्गत रोख स्वरुपात त्यांचे बँक खात्यावर जमा करणेकामी मध्यवर्ती भांडार कार्यालयामार्फत सन २०२४-२५ मध्ये प्राप्त झालेल्या विविध साहित्यांचे निश्चित करण्यात आलेल्या दरामध्ये १० टक्के नैसर्गिक वाढ गृहीत धरून मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे विषयपत्रात निश्चित करण्यात आलेल्या दरास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/भांडार/२९२, दि.०३/०७/२०२५ चे पत्र.

विषय क्र.२८४त्वर्य

पुणे मनपाच्या उद्यान विभागाकडील विविध उद्यानांकरिता सोयीसुविधा पुरविणे कामी निविदा मागविली असता आलेल्या २ निविदांपैकी दोघात कमी दर देणारे निविदाधारक मे. प्रतिक इलेक्ट्रिकल्स, पुणे यांचेकडून GeM पोर्टल कार्यपद्धतीनुसार र.रु.६९९०००=००(सर्व करांसह) पर्यंत काम करून घेणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस, तसेच त्यापोटी होणारे बिल अदा करणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/उद्यान/२९३, दि.०३/०७/२०२५ चे पत्र.

विषय क्र.२८५त्वर्य

मुठा नदीवर शिवणे ते नांदेड सिटीला जोडणारा नदीवरील पूल बांधणे या कामासाठी प्री व पोस्ट टेंडर ॲक्टीव्हीटीसाठी व प्रत्यक्ष कामावर सुपरव्हिजन करणेसाठी M/s.Envirosafe Consultant, यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/२९४, दि.०३/०७/२०२५ चे पत्र.

१) मुठा नदीवर शिवणे ते नांदेड सिटीला जोडणारा नदीवरील पूल बांधणे या कामासाठी प्री व पोस्ट टेंडर ॲक्टीव्हीटीसाठी व प्रत्यक्ष कामावर सुपरव्हिजन करणेसाठी M/s Envirosafe Consultants यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस.

२) M/s. Envirosafe Consultants यांनी सादर केलेल्या दरानुसार प्री टेंडर ॲक्टीव्हीटीमाठी प्रकल्प खर्चावर ०.३६% (शुन्य पॉइन्ट छत्तीस टक्के) व पोस्ट टेंडर ॲक्टीव्हीटीसाठी प्रकल्प खर्चावर ०.४५% (शून्य पॉइन्ट पंचेचाळीस टक्के) अशी एकूण कमाल फी ०.८१ % (एक पॉइन्ट तीनशे पंचेचाळीस टक्के) त्यांना अदा करणेस व त्यांचे समवेत करारनामा करणेस.

विषय क्र.२८६त्वर्य

चांदणी चौक - भूगाव रस्ता विकसित करून वाहतुकीच्या दृष्टीने त्यावरील चौकांवर उड्डाणपूल / ग्रेड सेपरेटर बांधणे या कामासाठी प्री व पोस्ट टेंडर ॲक्टीव्हीटीसाठी व प्रत्यक्ष कामावर सुपरव्हिजन करणेसाठी M/s. Pentacle Consultants (1) Pvt. Ltd., यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/२९५, दि.०३/०७/२०२५ चे पत्र.

१) चांदणी चौक - भूगाव रस्ता विकसित करून वाहतुकीच्या दृष्टीने त्यावरील चौकांवर उड्डाणपूल 1 ग्रेड सेपरेटर बांधणे या कामासाठी प्री व पोस्ट टेंडर ॲक्टीव्हीटीसाठी व प्रत्यक्ष कामावर सुपरव्हिजन करणेसाठी M/s. Pentacle Consultants (1) Pvt. Ltd. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस.

२) M/s. Pentacle Consultants (1) Pvt. Ltd. यांनी सादर केलेल्या दरानुसार प्री टेंडर ॲक्टीव्हीटीसाठी प्रकल्प खर्चावर ०.५०% (शुन्य पॉइन्ट पन्नास उक्के) व पोस्ट टेंडर ॲक्टीव्हीटीसाठी प्रकल्प खर्चावर ०.८४५% (शून्य पॉइन्ट आठशे पंचेचाळीस टक्के) अशी एकूण कमाल फी १.३४५ % (एक पॉइन्ट तीनशे पंचेचाळीस टक्के) त्यांना अदा करणेस व त्यांचे समवेत करारनामा करणेस.

विषय क्र.२८७त्वर्य

पुणे महानगरपालिका अंतर्गत आपत्ती व्यवस्थापनाचे कामकाजाकरीता टिपर व पोकलेन मशीन भाडेतत्वावर घेणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. बालाजी अर्थ मुव्हर ॲण्ड लँण्ड डेव्हलपर्स, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.१,८०,००,०००/- (जीएसटी विरहीत) पेक्षा -०.०१% ने कमी) असल्याने

त्यांचेकडून काम करून घेणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मोवावि/२९६, दि.०३/०७/२०२५ चे पत्र.

१) पुणे महानगरपालिका अंतर्गत आपत्ती व्यवस्थापनाचे कामकाजाकरीता टिपर व पोकलेन मशीन मे. बालाजी मुव्हर ॲण्ड लॅण्ड डेव्हलपर्स, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडरदराने (टेंडर रक्कम रू.१,८०,००,०००/- पेक्षा (-) ०.०१% ने कमी) एकूण रक्कम रु.१,७९,९८,२००/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी एकोगऐंशी लाख अठ्यान्नव हजार दोनशे फक्त) पर्यंत (जीएसटी लागू नाही) आवश्यकतेनुसार भाडेतत्वावर घेणेस व त्याकामी त्यांचे वरोवर करारनामा करणेस मान्यता मिळणेस

२) पुणे महानगरपालिका अंतर्गत आपत्ती व्यवस्थापनाचे कामकाजाकरीता टिपर व पोकलेन मशीन भाडेतत्वावर घेणे (निविदा क्र.७६/२०२५-२६) या निविदेचे "ब" पाकीट उघडलेपासून म्हणजेच दि.०३/०६/२०२५ पासून मे. बालाजी अर्थ मुव्हर ॲण्ड लॅण्ड डेव्हलपर्स, पुणे यांचेकडून आवश्यकतेनुसार आपत्ती व्यवस्थापनाचे कामकाजाकरीता टिपर व पोकलेन मशीन भाडेतत्वावर घेण्यात येत असल्याने प्रकरणी मान्यतेपूर्वी केलेल्या कामास पश्च्यात मान्यता मिळणेस

विषय क्र.२८८त्वर्य

पुणे मनपाच्या पौड व घोले रोड कचरा हस्तांतरण केंद्र येथून सेकंडरी कचरा वाहतुकीसाठी २८ क्यु.मी. बीआरसी/हायवा या वाहनाद्वारे १ वर्ष कालावधीकरीता वाहतूक करणेसाठी भाडेतत्वावरील वाहने घेणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी (टेंडर र.रु.४,३०,००,०००/-(जीएसटी विरहीत) पेक्षा (+)७% ने जादा) असल्याने त्यांचेकडून काम करून घेणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र.मआ/मोवावि/२९७, दि.०३/०७/२०२५ चे पत्र.

१) पुणे मनपाच्या पौड व घोले रोड कचरा हस्तांतरण केंद्र येवून सेकंडरी कचरा वाहतुकीसाठी २८ क्यू. मी. बीआरसी/हायवा या वाहनाद्वारे १ वर्ष कालावधी करीता अथवा टेंडर रकम संपेपर्यंत वाहतूक करणेसाठी भांडेतत्वावरील वाहने मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट यांचेकडून त्यांचे टेंडरदराने (टेंडर रक्कम रु.४३०,००,०००/- पेक्षा (+) ७% ने जादा) एकूण रक्कम रु.४,६०,१०,०००/- (अक्षरी रकम रुपये चार कोटी साठ लाख दहा हजार) पर्यंत (जीएसटी लागू नाही) आवश्यकतेनुसार घेणेस व त्याकामी त्यांचे बरोबर करारनामा करणेम.

२) पुणे मनपाच्या पौड व घोले रोड कचरा हस्तांतरण केंद्र येथून सेकंडरी कचरा वाहतुकीसाठी २८ क्यु. मी. बीआरसी/हायवा या वाहनाद्वारे १ वर्ष कालावधी करीता वाहतूक करणेसाठी भाडेतत्वावरील वाहने घेणे (निविदा क्र.०१/२०२५-२६) या निविदेचे "ब" पाकीट उघडलेपासून म्हणजेच दि.२०/०५/२०२५ पासून में स्वयंभू ट्रान्सपोर्ट यांचेकडून आवश्यकतेनुसार पुणे मनपाच्या पौड व घोले रोड कचरा हस्तांतरण केंद्र येथून सेकंडरी कचरा वाहतुकीसाठी २८ क्यु. मी बीआरसी/हायवा भाडेतत्वावर घेण्यात येत असल्याने प्रकरणी मान्यतेपूर्वी केलेल्या कामास पश्चात मान्यता मिळणेस.

विषय क्र.२८९त्वर्य

भारतीय संसदेमार्फत “The Role of Urban Local Bodies in strengthening constitutional democracy and nation building” या विषयावर दि.०३ जुलै २०२५ व दि.०४ जुलै २०२५ अशी दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद गुरूग्राम, हरियाणा या ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील परिषदेकरिता पुणे महानगरपालिकेतर्फे सदर परिषदेस उपस्थित राहणारे माजी महापौर व माजी उपमहापौर यांचा होणारा प्रवास खर्च खालील अर्थशिर्षकावर खर्ची टाकून अदा करणेस मान्यता मिळणे बाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र.नसजा/७४१, दि.०३/०७/२०२५ चे पत्र.

सन २०२५-२०२६ चे अंदाजपत्रक

१. मुख्य देखरेख व वसूली वगैरे

पान नं. ४२

क. महानगरपालिका व स्थायी समिती

१. नगरसचिव यांचे कार्यालय

१०. अखिल भारतीय / महाराष्ट्र महापौर परिपद व अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था प्रतिनिधी अधिवेशन

र.रु. ३,००,०००/- (अक्षरी र.रु. तीन लाख फक्त)

विषय क्र.२९०त्वर्य

सन २०२५-२६ या वर्षाच्या मिळकत एक रकमी भरल्यास देण्यात येणारी ५% अथवा १०% सवलतीस ०७ जुलै २०२५ पर्यंत मुदतवाढ मिळणेस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/करआकारणी/२९८, दि.०४/०७/२०२५ चे पत्र.

विषय क्र.२९१त्वर्य

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील प्रशासकीय सेवा लेखनिकी संवर्गातील पदोन्नतीचे स्तर कमी करणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/साप्र/२७७, दि.०१/०७/२०२५ चे विषयपत्रावर झालेला मा. विधी समिती ठराव क्र.०२ दि.०४/०७/२०२५ विचारासाठी.

विषय क्र.२९२त्वर्य

सांस्कृतिक केंद्रे विभागाकडील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक, गंजपेठ येथील दैनंदिन स्वच्छता विषयक कामांची रक्कम निविदा रकमेपेक्षा जास्त होत असल्याने खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सांस्कृतिक/२९९, दि.०४/०७/२०२५ चे पत्र.

१) शारदा सर्व्हिसेस यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक, गंजपेठ येथील टेंडर क्र.०४ मा.उप आयुक्त, सांस्कृतिक केंद्रे ठराव क्र. ५२ दि.१५/०६/२०२२ यास अधीन राहून दि. १०/११/२०२३ ते दि.३१/०३/२०२५ अखेर स्वच्छता विषयक कामाचे बिलापोटी खर्च रक्कम रुपये १५,१८,८३२=५५ या कामाचे देयके अदा करणेस.

२) शारदा सर्व्हिसेस यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक, गंजपेठ येथील टेंडर क्र.०४ स्वच्छता विषयक कामा करिता माहे मार्च २०२५ अखेर काही प्रशासकीय कारणास्तव टेंडर प्रक्रिया पूर्ण न झाल्यास पुढे दि. ०१/०४/२०२५ ते दि.३०/०६/२०२५ या ३ महिन्यांचा होणारा संभाव्य खर्च रुपये २,७८,७४२=७९ या संभाव्य खर्चास मान्यता मिळणेस.

३) शारदा सर्व्हिसेस यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक, गंजपेठ येथील टेंडर क्र.०४ स्वच्छता विषयक कामाची मूळ मान्य रक्कम रुपये ९,९२,१३६=६४१ (किमान वेतन दरातील दरवाढीसह) रक्कम रुपये १०,८६,३१६=०८ यापूर्वीच खर्ची पडली असून दि.१०/११/२०२३ ते दि. ३०/०६/२०२५ अखेर बाडीव कामापोटी होणारी संभाव्य रक्कम रुपये १७,९७,५७५=३४ अशी एकत्रित मूळ मान्य रक्कम गृहीत धरून एकूण रक्कम रुपये २८,८३,८९१=४२ होणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेस.

४) तसेच वेळोवेळी शासनाने दिलेली किमान वेतनातील दरवाढ सह देयके अदा करणेस.

५) याकामी अदा करावयाची रक्कम स्वच्छता विषयक ठेका RE28L109 या सन २०२५ - २६ चे अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर खर्च करणेस.

विषय क्र.२९३त्वर्य

सांस्कृतिक केंद्रे विभागाकडील मौलाना अबुल कलाम आझाद स्मारक, कोरेगाव पार्क येथील दैनंदिन स्वच्छता विषयक कामांची रक्कम निविदा रकमेपेक्षा जास्त होत असल्याने खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सांस्कृतिक/३००, दि.०४/०७/२०२५ चे पत्र.

१) सदर स्वच्छता विषयक कामाची मूळ मान्य रक्कम रुपये १४,८८,२०४=९६२ (किमान वेतन दरातील दरवाढीसह) दि.१०/११/२०२३ ते दि.२८/०२/२०२५ अखेर रक्कम रुपये ३९,२३,१०४=८८ यापूर्वीच खर्ची पडली असून दि. ०१/०३/२०२५ ते दि.३०/०६/२०२५ या ४ महिन्यांचा होणारा संभाव्य खर्च रुपये ५,६०,७५२.२६ वाढीव कामापोटी होणार असून संभाव्य एकूण रक्कम रुपये ४४,८३,८५७=१४ अशी एकत्रित मूळ मान्य रक्कम गृहीत धरणेस.

२) वेळोवेळी शासनाने दिलेली किमान वेतनातील दरवाढ सहदेयके अदा करणेस..

३) माहे मार्च २०२५ अखेर काही प्रशासकीय कारणास्तव टेंडर प्रक्रिया पूर्ण न झाल्यास पुढे दि. ०१/०३/२०२५ ते दि. ३०/०६/२०२५ या ४ महिन्यांचा होणारा संभाव्य खर्च रुपये ५,६०,७५२=२६ या संभाव्य खर्चास मान्यता निळणेस.

या कामी अदा करावयाची रक्कम स्वच्छता विषयक ठेका (RE28L108) या अर्थशिर्षकावर खर्च करणेस.

विषय क्र.२९४त्वर्य

सांस्कृतिक केंद्रे विभागाकडील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन येथील दैनंदिन स्वच्छता विषयक कामांची रक्कम निविदा रकमेपेक्षा जास्त होत असल्याने खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सांस्कृतिक/३०१, दि.०४/०७/२०२५ चे पत्र.

१) शारदा सर्व्हिसेस यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, पुणे स्टेशन येथील टेंडर क्र.०१ मा.उप आयुक्त, सांस्कृतिक केंद्रे ठराव क्र.५५ दि.१५/०६/२०२२ यास अधीन राहून दि.१०/११/२०२३ ते दि.३१/०३/२०२५ अखेर स्वच्छता विषयक कामाचे बिलापोटी खर्च रक्कम रुपये १५,१८,८३२=५५ या कामाचे देयके अदा करणेस व माहे- मार्च २०२५ अखेर काही प्रशासकीय कारणास्तव टेंडर प्रक्रिया पूर्ण न झाल्यास पुढे दि. ०१/०४/२०२५ ते दि.३०/०६/२०२५ या ३ महिन्यांचा होणारा संभाव्य खर्च रुपये २,७८,७४२=७९ या संभाव्य खर्चास मान्यता मिळणेस.

२) शारदा सर्व्हिसेस यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, पुणे स्टेशन येथील टेंडर क्र.०१ स्वच्छता विषयक कामाची मूळ मान्य रक्कम रुपये ९,९२,१३६=६४१ असून (किमान वेतन दरातील दरवाढीसह) रक्कम रुपये १०,८६,३१६=०८ यापूर्वीच खर्ची पडली असून दि.१०/११/२०२३ ते दि. ३०/०६/२०२५ अखेर वाढीव कामापोटी होणारी संभाव्य रक्कम रुपये १७,९७,५७५=३४ अशी एकत्रित मूळ मान्य रक्कम गृहीत धरून एकूण रक्कम रुपये २८,८३,८९१=३४ होणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेस.

३) तसेच वेळोवेळी शासनाने दिलेली किमान वेतनातील दरवाड अदा करणेस.

४) याकामी अदा करावयाची रक्कम स्वच्छता विषयक ठेका (RE28D110) या सन २०२५ २६ चे अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर खर्च करणेस.

विषय क्र.२९५त्वर्य

सांस्कृतिक केंद्रे विभागाकडील मा. हिंदू हृदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व्यंगचित्रकार कलादालन येथील दैनंदिन स्वच्छता विषयक कामांची रक्कम निविदा रकमेपेक्षा जास्त होत असल्याने खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सांस्कृतिक/३०२, दि.०४/०७/२०२५ चे पत्र.

१) शारदा सर्व्हिसेस यांना मा. हिंदू हृदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व्यंगचित्रकार कलादालन येथील टेंडर क्र.०६ मा.उप आयुक्त, सांस्कृतिक केंद्रे ठराव क्र. ५३ दि.१५/०६/२०२२ यास अधीन राहून दि. १०/११/२०२३ ते दि. ३१/०३/२०२५ अखेर स्वच्छता विषयक कामाचे बिलापोटी खर्च रक्कम रुपये १५,१८,८३२=५५ या कामाचे देयके अदा करणेस.

२) शारदा सर्व्हिसेस यांना मा. हिंदू हृदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व्यंगचित्रकार कलादालन येथील टेंडर क्र.०६ स्वच्छता विषयक कामाकरिता माहे- मार्च २०२५ अखेर काही प्रशासकीय कारणास्तव टेंडर प्रक्रिया पूर्ण न झाल्यास पुढे दि. ०१/०४/२०२५ ते दि.३०/०६/२०२५ या ३ महिन्यांचा होणारा संभाव्य खर्च रुपये २,७८,७४२=७९ या संभाव्य खर्चास मान्यता मिळणेस.

३) शारदा सर्व्हिसेस यांना मा. हिंदू हृदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व्यंगचित्रकार कलादालनयेथील टेंडर क्र. ०६ स्वच्छता विषयक कामाची मूळ मान्य रक्कम रुपये ९,९२,१३६=६४१ असून (किमान वेतन दरातील दरवाढीसह) रक्कम रुपये १०,८६,३१६=०८ यापूर्वीच खर्ची पडली असून दि.१०/११/२०२३ ते दि.३०/०६/२०२५ अखेर वाढीव कामापोटी होणारी संभाव्य रक्कम रुपये १७,९७,५७५=३४ अशी एकत्रित मूळ मान्य रक्कम गृहीत धरून एकूण रक्कम रुपये २८,८३,८९१=४२ होणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेस.

४) तसेच वेळोवेळी शासनाने दिलेली किमान वेतनातील दरवाढ अदा करणेस.

५) याकामी अदा करावयाची रकम स्वच्छता विषयक ठेका (RE28N109) या सन २०२५ २६ चे अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर खर्च करणेस

विषय क्र.२९६त्वर्य

महात्मा फुले सांस्कृतिक भवन, वानवडी येथील दैनंदिन स्वच्छता विषयक कामे स्वच्छता ठेकेदार मे. निलेश दिलीप काळे यांच्याकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत कलम ६७ (३) (क) अन्वये काम करून घेणेस खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सांस्कृतिक/३०३, दि.०४/०७/२०२५ चे पत्र.

१) स्वच्छता ठेकेदार मे. निलेश दिलीप काळे यांचे महात्मा फुले मंडई व पुणे महानगरपालिकेतील सर्व भाजी मंडया या ठिकाणीचे स्वच्छता विषयक कामे समाधानकारक असल्याने महात्मा फुले सांस्कृतिक भवन, वानवडी येथील दैनंदिन स्वच्छते अभावी कार्यक्रमांची गैरसोय होऊ नये म्हणून तात्पुरत्या स्वरूपात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत कलम ६७(३) (क) अन्वये स्वच्छता ठेकेदार मे. निलेश दिलीप काळे यांच्याकडून महात्मा फुले सांस्कृतिक भवन, वानवडी येथील स्वच्छता विषयक कामे ८ सेवकांकडून ४ महिने कालावधी करिता रक्कम रुपये ७,९२,५२१=६० अधिक (किमान वेतन दरातील दरवाढीसह) काम करून घेणेस अथवा नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत यापैकी जी क्रिया अगोदर घडेल त्या कालावधी पर्यंत प्रचलित दराने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत कलम ६७ (३) (क) अन्वये विशेष बाब म्हणून काम करून घेणेस.

२) महात्मा फुले सांस्कृतिक भवन, वानवडी येथील दैनंदिन स्वच्छते अभावी कार्यक्रमांची गैरसोय होऊ नये म्हणून तसेच स्वच्छता ही बाब अत्यावश्यक असल्याने व स्वच्छतेच्या वारंवार तक्रारी येत असल्याने स्वच्छता ठेकेदार मे. निलेश दिलीप काळे यांच्या कडून दि. ०१ फेब्रुवारी २०२५ पासून स्वच्छतेचे काम करून घेणेत येत असल्याने त्यास पश्चात मान्यता मिळणेस व त्यांचे कामाचे बिल दि. ०१ फेब्रुवारी २०२५ पासून अदा करणेस.

३) स्वच्छता ठेकेदार मे. निलेश दिलीप काळे यांच्या बरोबर योग्यतो करारनामा करणेस.

४) स्वच्छता ठेकेदार मे. निलेश दिलीप काळे यांचे स्वच्छता विषयक कामाचे दरमहाचे बिल १८ - सांस्कृतिक केंद्रे, महात्मा फुले सांस्कृतिक भवन, वानवडी, स्वच्छता विषयक ठेका (RE28M109) या अर्थशीर्षका मधून अदा करणेस

विषय क्र.२९७त्वर्य

पर्वती स.न १२१,१२२ स्वर्गीय पु.ल.देशपांडे उद्यान येथील कलाग्राम, सिंहगडरोड येथील दैनंदिन स्वच्छता विषयक कामे स्वच्छता ठेकेदार मे. निलेश दिलीप काळे यांच्याकडून महाराष्ट्र महापलिका अधिनियम कलम ६७ (३) (क) अंतर्गत काम करून घेणेस खालील बाबींस मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सांस्कृतिक/३०४, दि.०४/०७/२०२५ चे पत्र.

१) स्वच्छता ठेकेदार मे. निलेश दिलीप काळे यांचे महात्मा फुले मंडई व पुणे महानगरपालिकेतील सर्व भाजी मंडया या ठिकाणीचे स्वच्छता विषयक कामे समाधानकारक असल्याने स्वर्गीय पु.ल.देशपांडे उद्यान येथील

कलाग्राम, सिंहगडरोड येथील दैनंदिन स्वच्छते अभावी कार्यक्रमांची गैरसोय होऊ नये म्हणून तात्पुरत्या स्वरूपात महाराष्ट्र महापलिका अधिनियम कलम ६७ (३) (क) अंतर्गत स्वच्छता ठेकेदार मे. निलेश दिलीप काळे यांच्याकडून स्वर्गीय पु.ल.देशपांडे उद्यान येथील कलाग्राम, सिंहगडरोड येथील स्वच्छता विषयक कामे १० सेवकांकडून ४ महिने कालावधी करिता रक्कम रुपये ९,९०,६५२=०० अधिक (किमान वेतन दरातील दरवाढीसह) काम करून घेणेस अथवा नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत यापैकी जी क्रिया अगोदर घडेल त्या कालावधी पर्यंत प्रचलित दराने महाराष्ट्र महापलिका अधिनियम कलम ६७ (३) (क) अंतर्गत विशेष बाब म्हणून काम करून घेणेस

२) स्वर्गीय पु.ल.देशपांडे उद्यान येथील कलाग्राम, सिंहगडरोड येथील दैनंदिन स्वच्छते अभावी कार्यक्रमांची गैरसोय होऊ नये म्हणून तसेच स्वच्छता ही बाब अत्यावश्यक असल्याने व स्वच्छतेच्या वारंवार तक्रारी येत असल्याने स्वच्छता ठेकेदार मे. निलेश दिलीप काळे यांच्या कडून दि. ११ एप्रिल २०२५ पासून स्वच्छतेचे काम करून घेणेत येत असल्याने त्यास पश्चात मान्यता मिळणेस व त्यांचे कामाचे बिल दि. ११ एप्रिल २०२५ पासून अदा करणेस.

३) स्वर्गीय पु.ल.देशपांडे उद्यान येथील कलाग्राम, सिंहगडरोड येथील दैनंदिन स्वच्छतेचे काम १० सफाई सेवकांकडून करून घेणेस.

४) स्वच्छता ठेकेदार मे. निलेश दिलीप काळे चांचे स्वच्छता विषयक कामाचे बिल अदा करणेस.

५) स्वच्छता ठेकेदार मे. निलेश दिलीप काळे यांच्या बरोबर योग्यतो करारनामा करणेस.

६) स्वच्छता ठेकेदार मे. निलेश दिलीप काळे यांना स्वच्छता विषयक कामाचे दरमहाचे बिल १८ - सांस्कृतिक केंद्रे, "विठ्ठल तुपे पाटील नाट्यगृह हडपसर, स्वच्छता विषयक ठेका (RE28R109) या अर्थशीर्षकामधून अदा करणेस.

विषय क्र.२९८त्वर्य

यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड येथील कॅन्टीन निविदा पध्दतीने ३ वर्ष कालावधी करीता चालविणेत देणे बाबतची मे. इंदोरीलाल यांची जी.एस.टी सह वार्षिक रक्कम रुपये १३,४४,००६=२१० (र.रु.११,३८,९८८=२१० + २,०५,०१८ जी.एस.टी) ची निविदा स्विकारून त्यांना कार्यादेश देणेस, टेंडर अटी शर्ती नुसार प्रथम वर्षी मान्य मक्ता रक्कम रुपये १३,४४,००६=२१० स्विकारून पुढील प्रत्येक वर्षी १०% वाढीने कॅन्टीनचा मक्ता देण्यास व यांच्या सोबत करारनामा करणेसाठी खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सांस्कृतिक/३०५, दि.०४/०७/२०२५ चे पत्र.

१) सांस्कृतिक केंद्रे विभागाकडील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड येथील कॅन्टीन निविदा पद्धतीने ३ (तीन) वर्षे कालावधी करिता चालविणेस देणे बाबतची मे. इंदोरीलाल यांची जी.एस.टी सह वार्षिक रक्कम रुपये १३,४४,००६=२१० (र.रु.११,३८,९८८=२१० + २,०५,०१८ जी.एस.टी १८%) ची निविदा स्विकारून मे.इंदोरीलाल यांना कार्यादेश देणेस.

२) टेंडर अटी शर्ती नुसार प्रथम वर्षी मान्य मक्ता रक्कम रुपये १३,४४,००६=२१० स्विकारून पुढील प्रत्येक वर्षी १०% वाढीने सांस्कृतिक केंद्रे विभागाकडील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड येथील कॅन्टीनचा मक्ता देणेस

३) इंदोरीलाल यांच्या सोबत करारनामा करणेस.

विषय क्र.२९९त्वर्य

येरवडा हॉट मिक्स प्लांट येथे डांबरी मिक्स मालाची वाहतूक करणे करिता दैनंदिन कामासाठी हायवा/डंपर व मशिनरी भाडेतत्वावर घेणे (कार्यकारी अभियंता झोन ३) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. JAY SHANKAR ASSOCIATES यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.४९९९८५१/- पेक्षा २७.००% ने कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३६४९८९१=२३ अधिक जीएसटी र.रु.०/- पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रु.०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.३६४९८९१=२३ पर्यंत करणेस व त्यांचेशी करारनामा करून, ब पाकीट उघडलेचे दिनांक (२९-०५-२०२५) पासून काम करून घेणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति. महा. आयुक्त (वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/३०६, दि.०४/०७/२०२५ चे पत्र.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका